**MHST070061642025**

# फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ४४३/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश

(जय बाळकृष्ण चव्हाण वि. महाराष्ट्र सरकार )

(पारीत दि. ०३.०७.२०२६)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा कराड शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. १०६९/२०२५ मधील जप्त मुद्देमाल Samsung कंपनीचा Galaxy F23 5G हा मोबाईल परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदरचा मुद्देमाल हा त्याचे मालकीचा आहे. सदर मोबाईल हा पोलीसांच्या ताब्यात राहील्यास तो खराब होण्याची दाट शक्यता असल्याने त्यास तो परत द्यावा, अशी अर्जदाराने विनंती केली आहे. अर्जदाराने त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सबब, सदरचा मुद्देमाल परत करण्याची विनंती केली आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि तपासी अधिकारी यांनी म्हणणे अनुक्रमे नि. १ तसेच नि. ५ वर दाखल केले असून, सदर गुन्हा करण्यासाठी जप्त मोबाईल हॅण्डसेटचा वापर केलेला आहे. अर्जदार यास नमुद जप्त मोबाईल ताब्यात दिलेस तो अन्य गुन्ह्याचे कामी त्याचा वापर करण्याची शक्यता आहे. तसेच अर्जदार याचे ताब्यात सदरचा मुद्देमाल दिलेस तो त्याची विक्री, हस्तांतरण करणेची अथवा त्याचे रचनेत बदल करणेची शक्यता आहे. सबब, जप्त मुद्देमाल अर्जदारास परत करण्यात येवू नये.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखांचे अवलोकन केले.

५. अर्जदार हा सदर गुन्ह्यातील आरोपी आहेत. तसेच, अर्जदार याने मोबाईल खरेदी केलेबाबतची पावती नि. ३/१ व स्वतःचे आधारकार्डची साक्षांकित प्रत नि. ३/२ वर दाखल केली आहे. अशाप्रकारे, सदर अर्जदाराची मुद्देमालावरील त्याची मालकी प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदाराशिवाय इतर कोणीही सदरचे मोबाईलबाबत मालकीहक्काचा दावा केलेला नाही अगर, त्याचा कब्जा मागितलेला नाही. सकृतदर्शनी सदरचा मोबाईल अर्जदाराच्या मालकीचा असल्याचे

दिसून येते. त्यामुळे अशापरिस्थितीत, सदर जप्त मुद्देमाल हा पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास तो खराब होण्याची शक्यता आहे.

६. ***सुंदरभाई वि. स्टेट ऑफ गुजरात,(२००२)१० एसपी. २८३,*** या न्यायनिवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने ''जप्त मुद्देमाल हा योग्य त्या अटी व शर्तीवर लवकरात लवकर परत करणेबाबतचे आदेश करणे न्यायालयांवर बंधनकारक आहे, असे न्यायतत्व मांडले आहे'' तरी योग्य त्या अटीवर जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात देणे न्यायाचे आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदाराने रक्कम रुपये २०,०००/- चे बंधपत्र लिहून दिल्यानंतर खालील अटींवर तपासी अधिकारी यांनी जप्त मुद्देमाल Samsung कंपनीचा Galaxy F23 5G हा मोबाईल अर्जदाराच्या ताब्यात देण्यात द्यावा.

अ. अर्जदाराने त्यामध्ये कोणताही अंतर्गत व बाहय फेरबदल करु नये. तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये.

ब. न्यायालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय त्याची विल्हेवाट लावू नये.

क. न्यायालय आदेश देईल त्यावेळी सदर मोबाईल न्यायालयासमक्ष हजर करावा.

ड. अर्जदाराने सदर मोबाईलचा उपयोग कोणत्याही गुन्हयामध्ये पुन्हा करु नये.

ई. तपासी अधिकारी यांनी सदर मोबाईल परत देताना त्याचा पंचनामा, छायाचित्रे काढावीत व ती दोषारोपपत्रासोबत दाखल करावीत.

BOMIDWAR SUDHIR MADHUKAR
Digitally signed by BOMIDWAR SUDHIR MADHUKAR
Date: 2026.07.03 17:22:22 +0530

कराड. (सुधीर म.बोमीडवार)

दिनांक :- ०३.०७.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कराड.

(कोर्ट नं.१)